लोकमत पान क्र. 5

# बोलणे बंद केले, म्हणून अभिनेत्रीवर केले वार

## मित्रावर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : बोलणे बंद केले म्हणून एका तरुणाने परिचित अभिनेत्रीला तिच्या इमारतीत गाठून धमकी देत गालावर वार करून जखमी केल्याची घटना मीरा रोडमध्ये घडली आहे. फिर्यादीनंतर काशिगाव पोलिस ठाण्यात शर्माविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मीरा रोडच्या गौरव एक्सलन्सीमध्ये साक्षी नीरज कपूर ही अभिनेत्री राहते. तिची रोहित कीर्ती शर्मा (२८, रा. राजेश एन्क्लेव्ह, साईबाबानगर, मीरा रोड) याच्याशी ४ ते ५ वर्षांपासून ओळख होती. साक्षीच्या फिर्यादीनुसार ती त्याचे कॉल घेत नव्हती. १७ नोव्हेंबरच्या सायंकाळपासून त्याने तिला व तिच्या आईला कॉल केले. आईकडे तिच्याबद्दल विचारणा केली असता साक्षी थोड्याच वेळात घरी येईल, असे शर्मा याला समजले. साक्षी अंधेरी येथून कामावरून रात्री परतत असताना इमारतीच्या बाहेर ती रिक्षातून उतरताच शर्माने तिला गाठले. तू माझ्याशी बोलत नाहीस, असे बोलत तिच्याशी वाद घातला. शर्मा याने तिच्या दिशेने हात उचलला असता तिने हांत झटकला. त्यावेळी त्याच्या हातातील शस्त्राने तिच्या गालावर वार केल्याने तिला जखम झाली. 'तू माझ्याशी बोलली नाहीस तर तुझी जिंदगी खराब करून टाकेन,' असे धमकावत तिला शिवीगाळ केली.

# वादातून तरुणाने महिलेला केली मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदर पश्चिम स्मशानभूमीजवळ भोला नगर येथे राहणाऱ्या सरिता हरिराम प्रजापती (३४) यांच्या कुटुंबियांचा व समोर राहणाऱ्या धर्मेंद्र गुप्ता कुटुंबियांचा आपसात वाद झाला होता. धर्मेंद्र यांचा मुलगा आकाश (२४) याने सरिता व तिच्या सासूला शिवीगाळ केली. त्याने त्यांच्या दिशेला चप्पल फेकून मारली.

सरिता यांनी आकाशच्या आईला तो शिवीगाळ करत असल्याचे सांगितले, पण तिने दुर्लक्ष केले. त्यानंतर आकाशने त्याच्या हातातील कड्याने सरिता यांच्या डोळ्याखाली गालावर मारले. त्यामुळे जखम होऊन गालातून रक्त येऊ लागले. याप्रकरणी भाईंदर पोलिसांनी १८ नोव्हेंबर रोजी आकाश गुप्ता याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

लोकमत पू. पान क्र. ३

## मनोरुग्णाची आत्महत्या



नालासोपारा : चिंचोटीच्या गणेश वाडीतील अपना घर आश्रमात मनोरुग्ण राजन (६०) यांनी आत्महत्या केली आहे. ते मानसिक आजाराने त्रस्त होते. त्यांनी मंगळवारी सकाळी पैजामाचा इलेस्टिक हे आश्रमातील खिडकीच्या ग्रीलला बांधून त्याच्या साहाय्याने गळफास घेतला. नायगाव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

## तरुणाची आत्महत्या



नालासोपारा : ओमनगर येथील दुर्गेश्वरी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या आशिष सैनी (१९) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याने सोमवारी रात्री कोणत्यातरी कारणावरून रूमच्या छताच्या लोखंडी अँगलला पँन्टच्या कापडी बेल्टने गळफास घेत आत्महत्या केली आहे. तुळींज पोलिसांनी मंगळवारी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.



वसईत मतदानासाठी मतदारांमध्ये उत्साह दिसून आला. सकाळपासूनच नागरिकांनी मतदान केंद्रांवर मतदानासाठी रांगा लावल्या होत्या.

# वसईत चोख बंदोबस्तात शांततेत झाले मतदान

### तरुण मतदारांमधील उत्साह शिगेला

लोकमत न्यूज नेटवर्क

पारोळ : विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी अत्यंत उत्साहात व शांततेत मतदान पार पडले. कोणताही वादविवाद झाला नाही. दुपारी रणरणत्या उन्हातही मतदान सुरूच होते. उत्स्फूर्तपणे मतदार मतदान करताना दिसत होते.

यावेळेस निवडणुकीचा सर्व पक्षांकडून जोरदार प्रचार झाला होता. मतदारांमध्ये जागृती झाल्याने मतदारांमध्ये उत्साह पाहायला मिळाला. तर सर्वपक्षीय प्रचार पाहता, मतदानाच्या दिवशी सकाळी गर्दी होईल, अशी अपेक्षा होती. त्याचप्रमाणे वसई, नालासोपारा, बोईसर या तीनही विधानसभा क्षेत्रात सकाळी ७ ते १२ तसेच काही ठिकाणी एक वाजेपर्यंत मतदानाला चांगली गर्दी केली, तर दुपारी २ ते ६ यादरम्यान कमी गर्दी पाहायला मिळाली. काही वेळा मतदारांना बाहेर काढण्यासाठी कार्यकर्त्यांना जावे लागते. यावेळेस मात्र बहुतांश मतदार स्वत:च मतदान केंद्रापर्यंत येत होते. यात महिला, ज्येष्ठ नागरिक, पुरुष अशा सर्वांचा सहभाग होता.

### पोलिसांचा फौजफाटा

वसई तालुक्यात येत असलेल्या बोईसर विधानसभा मतदान क्षेत्रात प्रत्येक मतदान केंद्राची सुरक्षा गुजरात पोलिसांच्या हाती देण्यात आली होती. तर बाहेरील सुरक्षाही स्थानिक पोलिसांना देण्यात आली होती. प्रथमच तालुक्यात गुजरात पोलिसांचा मोठा फौजफाटा या निवडणुकीत सुरक्षेसाठी आणण्यात आला होता.

### मंडपांची सोय

मतदान करताना मतदारांना आजचा त्रास होऊ नये यासाठी मतदान केंद्रावर मंडप टाकण्यात आले होते. तसेच यावेळी मतदान केंद्रावर पाळणाघराची व्यवस्था करण्यात आली. तसेच अपंग व्यक्तींसाठी व्हीलचेअर व मतदारांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली.

### झेंड्यास बंदी

राजकीय पक्षांच्या बुधवार झेंडे लावण्यास बंदी असल्याने बविआच्या कार्यकर्त्यांनी पिवळ्या रंगाचे टीशर्ट, टोप्या परिधान केल्या होत्या. भाजप व शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी भगवे कपडे घातले होते.

लोकमत - पृ. पान क्र. ३

# मीरा-भाईंदरमध्ये प्रचंड वाहतूककोंडी

## मतदान केंद्राबाहेर नियोजनाच्या अभावाचा फटका : वाहनांच्या लांबच लांब रांगा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमध्ये बुधवारी मतदानाच्या दिवशी रस्त्यांवर तसेच मतदान केंद्राबाहेर कसेही लावलेले उमेदवारांचे टेबल, केंद्राबाहेर वाहनांची बेशिस्त पार्किंग त्यात वाहतूक पोलिसांनाही निवडणूक कामी लावल्याने ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीत पोलिस अधिकारीही अडकून पडले होते.

बुधवार २० नोव्हेंबर रोजीच्या मतदानाच्या अनुषंगाने उमेदवारांकडून मतदारांना मतदान केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी रिक्षा आदी वाहने तैनात केली जातात. शिवाय अनेक मतदारही दुचाकी वा चारचाकी वाहने घेऊन मतदानासाठी येतात.



मीरा-भाईंदरमध्ये मतदान केंद्राबाहेर वाहनांची बेशिस्त पार्किंग, त्यात वाहतूक पोलिसांनाही निवडणूक कामी लावल्याने ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

शिवाय उमेदवार आदी मतदान केंद्रात येतात; मात्र मतदान केंद्राबाहेर मतदानासाठी येणारी वाहने उभी करण्यासह त्याचे नियोजन केले गेले नाही. मतदान केंद्राच्या प्रतिबंधात्मक क्षेत्राबाहेर उमेदवारांच्या प्रतिनिधींनी टेबले वाट्टेल तशी लावली गेली होती. केंद्राबाहेर रस्त्यावर वाहनांची आधीच असलेली अस्ताव्यस्त पार्किंगमुळे आणखी अडचण होत होती. अशा विविध कारणांनी मतदान केंद्राबाहेर वाहनांची कोंडी झाली होती.

### पोलिस अधिकारीही अडकले कोंडीत

- भाईंदर पश्चिमेला तर वाहनांची कोंडी मोठी होती. लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीत लोक अडकून पडले. इतकेच नव्हे तर बडे पोलिस अधिकारीही या कोंडीत अडकले होते.
- वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी वाहतूक पोलिस ही नव्हते. वाहतूक पोलिसांना पण निवडणूक काम लावल्याने वाहतुकीचे नियोजन वाऱ्यावर होते.
- काही उमेदवारांचे कार्यकर्तेच शेवटी वाहतूक कोंडी सोडवण्याचा प्रयत्न करत होते. बेशिस्त वाहन चालकांमुळे वाहतूक कोंडी आणखी तीव्र बनली होती.

# मृत्यूस कारणीभूत ठरल्याने गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क


**नालासोपारा :** कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही खबरदारी न घेता त्यांच्या मृत्यू आणि जखमी होण्यास कारणीभूत ठरलेल्या बांधकाम कॉन्ट्रॅक्टर आणि जागा मालकांवर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हबीब यांच्या मालकीच्या नायगावच्या ससनुवघर येथील सर्व्हे नंबर १७४/१ येथे ५ नोव्हेंबरला गोडावूनचे बांधकाम चालू होते. त्याठिकाणी मुसरदिर शेख हा छताला पत्रे लावण्यासाठी शिडीवर चढत असताना शिडीवरून खाली फिरोजद्दीन शेख याच्या अंगावरून जमिनीवर पडला. त्यात दोघांनाही गंभीर दुखापत झाल्याने ऑर्बिट हॉस्पिटल येथे उपचार सुरू होते. यातील मुसरदिर शेख याचा मृत्यू झाला तर फिरोजद्दीन हा गंभीर जखमी झाला. या गोडावूनच्या ठिकाणी बांधकाम कॉन्ट्रॅक्टर सिरजुल शेख व जागा मालक हबीब शेख हे कामगारांच्या जीविताच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून कोणतीही उपाययोजना न करता व खबरदारी न घेता काम करून घेत असताना दोघांना किरकोळ व गंभीर दुखापत झाली. नायगाव पोलिसांनी मंगळवारी बांधकाम कॉन्ट्रॅक्टर सिरजुल सादअली शेख व जागा मालक हबीब शेख यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

पुण्यनगरी पु. पान क्र. 7

# वसईत पुसट शाई, यादीतून नावे गायब झाल्याच्या तक्रारी



। वसई : मंगळवारी भाजप आणि बहुजन विकास आघाडीत झालेल्या राड्यानंतर बुधवारी वसई-विरारमध्ये शांततेत मतदान पार पडल्यामुळे पोलीस आणि निवडणूक यंत्रणेने मोकळा श्वास घेतला आहे. बुधवारी सकाळी ७ पासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत वसईत ५९.१२, नालासोपारात ५२. ३४ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली होती.

मतदारांनी उत्स्फूर्तपणे आपला हक्क बजावला. त्यात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शारिरीक व्याधीने त्रस्त असलेल्या मतदारांचा मोठा सहभाग होता. त्यांच्यासाठी पालिकेच्या आरोग्य विभागाने व्हीलचेअर आणि नर्सची व्यवस्था केली होती. मतदारयादीत पहिल्यांदाच नाव आलेल्या तरुणांनी मोठ्याउत्साहाने रांग लावून मतदानाचा हक्क बजावला. हर्ष ठाकूर, धवल पाटील, धनेश माने, मीत नाईक या तरुणांनी नालासोपारा आणि वसई मतदारसंघात आपला पहिल्यांदाच हक्क बजावला. नेहमी सर्वांना मतदान करताना पाहून आपल्याला हा हक्क कधी बजावता येईल, याची उत्सुकता होती. ती इच्छा पूर्ण झाली. या मतदानातून आपण भारतीय नागरिक झाल्याचा अभिमान वाटतो, अशी प्रतिक्रिया नवमतदार मीत नाईक याने व्यक्त केली. तर मतदान प्रक्रिया अधिक सक्षम होणे गरजेचे आहे. शाईच रंग आणखी गडद असायला हवा आणि गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावणे गरजेचे आहे, असे धनेश माने याने सांगितले. नेहमीप्रमाणे मतदान प्रक्रियेतही गोंधळ दिसून आला. पुसट शाही, ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड, यादीतून गायब झालेली नावे या चुका कायम राहिल्या.

■ भाजप आणि बहुजन विकास आघाडी त मंगळवारी सकाळी विवांता हॉटेलमध्ये राडा झाला होता. या राड्यात मारहाणही झाली होती. संपूर्ण दिवस हा राडा निस्तरण्यात आणि गुन्हे दाखल करण्यात गेल्यानंतर निवडणूक आणि पोलीस यंत्रणा दुसऱ्या दिवशी होणाऱ्या मतदानाच्या बंदोबस्ताला लागली होती. या राड्याचे पडसाद मतदान प्रक्रियेवर होण्याची धास्ती यंत्रणेला होती. त्यामुळे भरारी पथके डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवून होते.

पुण्यनगरी पू. पान क्र. 7

# भाईंदर पश्चिमेला दोन गटात वाद, काही काळ वातावरण तंग

**मीरा रोड** : मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघात गेल्या निवडणुकीपेक्षा यंदा मतदान टक्केवारीत वाढ झाली आहे. सकाळी ७ पासून मतदान केंद्राबाहेर रांगा लागल्या होत्या. सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४८.३६ टक्के मतदान झाले. भाईंदर पश्चिमेला दोन गटात वाद निर्माण झाला होता. ते वगळता मतदान शांततेत पार पडले. मीरा रोड पूर्वेच्या नयानगर शाळेच्या अंजुमन शाळेत व उत्तन येथे मतदारांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

भाईंदर पश्चिमेच्या बावन जिनालय जैन मंदिर येथे दुपारी भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता व अपक्ष उमेदवार गीता जैन यांचे कार्यकर्ते नारायण नांबियार यांच्यात बाचाबाची झाल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी मध्यस्थी करत वाद मिटवून पुन्हा शांतता प्रस्थापित केली.

## मीरा भाईंदरमध्ये ४८.३६ टक्के मतदान

मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघात पुरुष २ लाख ६७ हजार ७८५, महिला २ लाख ४३ हजार ७२ व इतर ५ असे एकूण ५ लाख १० हजार ८६२ मतदार आहेत. काही भागात सकाळपासून गर्दी होती तर काही भागात सकाळी ९ नंतर गर्दी होऊ लागली. सकाळी ७ ते ९ पर्यंत ७. २१ टक्के मतदान झाले होते. सकाळी ११ पर्यंत १८.०२ टक्के मतदान, नंतर २९.९५ टक्के मतदान दुपारी १ पर्यंत मतदान झाले. तीन वाजेपर्यंत ३९.१० टक्के, ५ वाजेपर्यंत ४८ . ३६ टक्के मतदान झाले. पोलीस आयुक्त मधुकर पांडे, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे व गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे आणि मीरा भाईंदर परिमंडळाचे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड हे शहरात फिरून मतदान केंद्रांना भेटी देत होते. तसेच कुठेही अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी दक्षता घेत होते.



विकासाची कामे करणाऱ्या उमेदवाराला मतदान करणार, तसेच शहरात चांगले शिक्षण, सुसज्ज रुग्णालय व रस्ते, पार्किंग ह्यावर भर देऊन कामे करणारा उमेदवार असावा, असे मत प्रथम मतदान करणाऱ्या खुशी जिनाद्रा, शांती नगर येथील रहिवासी यांनी म्हटले. प्रथमच मतदान करत असल्यामुळे उत्साह वाटत होता. मतदान केल्यामुळे आनंद वाटत होता. गर्दीमध्ये दीड – दोन तास लागल्यामुळे कंटाळा आला. तरुण पिढीला गर्दीत उभे राहणे आवडत नसल्यामुळे यामध्ये सुधारणा होणे आवश्यक असल्याचे पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या प्रथमेश कामडी, डाचकुल पाडा, काशीमीरा याने सांगितले.

म. टा. पान क्र. 7

# 'तावडेंना आता कंठ फुटला'

म.टा. वृत्तसेवा, वसई

'भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे हे काल भिजलेल्या कोंबडीप्रमाणे शांत होते, आज त्यांना कंठ फुटला आहे,' अशी टीका बहुजन विकास आघाडीचे नेते हितेंद्र ठाकूर यांनी बुधवारी केली.

विरारच्या विवांता हॉटेलमध्ये विनोद तावडे हे पैसेवाटप करीत असल्याचा आरोप करीत मंगळवारी 'बविआ' कार्यकर्त्यांनी त्यांना घेराव घातला होता. सुमारे साडेतीन तास चाललेल्या या गोंधळनाट्याचे राज्याच्या राजकीय वर्तुळात जोरदार पडसाद उमटले. मला खोट्या प्रकरणात गोवण्याचा प्रयत्न 'बविआ'ने केला असून, ते हॉटेलही ठाकूर यांचेच आहे, अशी प्रतिक्रिया विनोद तावडे यांनी बुधवारी दिली. या पार्श्वभूमीवर हितेंद्र ठाकूर यांनी तावडे यांना लक्ष्य केले. या प्रकरणामुळे भाजपला फायदा होईल, असे भाजप नेते सांगत आहेत. याचा अर्थ हॉटेलमध्ये सापडलेले पैसे भाजपने मतदारांना वाटले असा होतो, असे ठाकूर म्हणाले. हॉटेल माझ्या मालकीचे होते तर भाजपने का बुक केले, असा प्रश्न त्यांनीउपस्थित केला.

## हितेंद्र ठाकूर यांची विनोद तावडे यांच्यावर टीका

CamScanner

लोकसत्ता पु. पान क्र. ३

# विनोद तावडे यांचा मुंबईला गेल्यावर प्रतिवाद

## हितेंद्र ठाकूर यांची टीका

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : नोटावाटप नाट्य प्रकरणानंतर बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांनी पुन्हा एकदा भाजप सरचिटणीस विनोद तावडे यांच्यावर टीका केली आहे. 'काल विनोद तावडे शांत बसले होते आणि मुंबईला गेल्यावर त्यांनी प्रतिवाद केला, असे ठाकूर म्हणाले. गुन्हा दाखल झालातरी ते उलट आरोप करत आहेत. खोटे बोला पण रेटून बोला, अशी भाजपची वृत्ती असल्याचे ते म्हणाले.

विरारच्या विवांता हॉटेलमध्ये नोटावाटप नाट्य घडले. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे या हॉटेलमध्ये पैसे वाटत असल्याचा आरोप करत बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते हॉटेलमध्ये शिरले होते. तब्बल साडेचार तास त्यांनी भाजप नेत्यांची कोंडी केली होती. या प्रकरणात भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासह भाजपच्या काही कार्यकर्त्यांवर पैशांचे वाटप करून मतदारांना लाच दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. विनोद तावडे यांनी मात्र आता बविआवर आरोप केले आहेत.

### आरोपांचे खंडन

- हितेंद्र ठाकूर यांनी तावडे यांनी केलेल्या आरोपांचा खरपूस समाचार घेतला. या प्रकरणामुळे भाजपला फायदा होईल असे भाजप नेते सांगत आहेत. याचा अर्थ हॉटेलमध्ये सापडलेले पैसे भाजपने मतदारांपर्यंत वाटले असा होतो, असे ते म्हणाले. विवांता हॉटेल हितेंद्र ठाकूर यांच्या मालकीचे होते, असा आरोप विनोद तावडे यांनी केला.
- त्याला ठाकूर यांनी उत्तर दिले. जर हॉटेल माझ्या मालकीचे होते तर भाजपने का बुक केले ? विनोद तावडे यांनी ते हॉटेल माझ्या नावावर करून द्यावे असेही ते म्हणाले. विनोद तावडे काल विरारमध्ये असताना शांत बसले होते. मला सारखे फोन करता होते. आता मुंबईत गेल्यावर ते आरोप करत आहेत. खोटे बोला पण रेटून बोला ही भाजपची प्रवृत्ती आहे, असे ते म्हणाले. मतदारसंघामध्ये बाहेरची लोकं आल्याने हा वाद निर्माण झाला होता. आज जर पुन्हा कोणी बाहेरून आलेले दिसले तर त्यांच्या विरोधात योग्य कारवाई करू, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

# नोटावाटप आरोपाचा भाजपला फायदा

## राजन नाईक यांचा दावा



लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : 'नोटावाटप' आरोप प्रकरण हा बहुजन विकास आघाडीचा स्टंट होता. यामुळे नालासोपारा मतदारसंघात आम्हाला पाच ते सात टक्क्यांची वाढ होईल तसेच वसई मतदारसंघातही लाभ होईल, असा दावा नालासोपारा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार राजन नाईक यांनी केला.

मंगळवारी भाजपचे राष्ट्रीय सचिव विनोद तावडे विरारमधील विवांता हॉटेलमध्ये कार्यकर्त्यांची सभा घेत होते. या ठिकाणी पैसे वाटप होत असल्याचा आरोप करत बहुजन विकास आघडीचे कार्यकर्ते या हॉटेलमध्ये शिरले होते. बविआच्या कार्यकर्त्यांनी तब्बल साडेचार तास विनोद तावडे आणि उमेदवार राजन नाईक यांच्यासह भाजपच्या नेत्यांची कोंडी केली होती. या ठिकाणी हॉटेलच्या खोलीत साडेनऊ लाख रुपयांची रोकड आढळली होती. या प्रकरणावर पहिल्यांदाच राजन नाईक यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

निवडणुकीच्या आदल्या दिवशी कार्यकर्त्यांच्या बैठकीसाठी विनोद तावडे आले होते. परंतु बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी येथे धुमाकूळ घातला. मात्र हा डाव त्यांच्यावरच उलटला असल्याचे राजन नाईक म्हणाले.

# 'आम्हाला सोडवायला कुणी आले नाही'

## हॉटेलमध्ये अडकलेल्या भाजप वरिष्ठ कार्यकर्त्यांची खंत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

वसई : आम्हाला साडेचार तास हॉटेलमध्ये अडकवून ठेवले होते. साऱ्या देशात हा तमाशा दूरदर्शनवर दिसत होता. परंतु आम्हाला सोडवायला कुणी वरिष्ठ आले नाही की पोलीस यंत्रणेला आदेश दिले नाहीत, अशी खंत हॉटलमध्ये अडकलेल्या भाजपच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

विरारमधील विवांता हॉटेलमध्ये घडलेल्या नोटावाटप नाट्यादरम्यान भाजपचे अनेक वरिष्ठ कार्यकर्ते अडकून पडले होते. बविआच्या कार्यकर्त्यांनी हॉटेलचे प्रवेशद्वार बंद केल्याने कुणाला बाहेर पडता येत नव्हते. बविआच्या कार्यकर्त्यांनी हॉटेलमध्ये प्रवेश करताच भाजपच्या काही वरिष्ठ कार्यकर्त्यांना बेदम मारहाण करून आपली दहशत निर्माण केली होती. त्यामुळे आत असलेले नेते, पदाधिकारी हतबल झाले होते. बविआचे कार्यकर्ते हॉटेलच्या खोल्यांची आणि बॅगांची तपासणी करत होते.

भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना दमदाटी केली जात होती. हा प्रकार तब्बल साडेचार तास सुरू होता. आम्हाला एकप्रकारे आत कैद करून ठेवले होते. परंतु आम्हाला वरिष्ठ नेते कुणीच सोडवायला आले नाही, अशी खंत भाजपच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

### 'तो' भाजप नेता कोण?

विवांता हॉटेलमध्ये पैसे वाटप होत असल्याची टिप भाजपच्या एका मोठ्या नेत्याने दिली, असा दावा आमदार हितेंद्र ठाकूर यांनी केला होता. त्यामुळे तो नेता कोण त्याची चर्चा दिवसभर सुरु होती. मात्र बविआचे काही स्थानिक नेते या हॉटेलमध्ये गेले असता त्यांना विनोद तावडे आल्याचे समजले होते. त्यानंतर बविआच्या कार्यकर्त्यांना कळवले असेही सांगण्यात येत आहे.

### मतदानावर परिणाम

मंगळवारी झालेल्या राड्याचे प्रकरणाचे पडसाद बुधवारी झालेल्या मतदानावर दिसून आले. विरार आणि नालासोपारा शहरात बविआच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह होता. महायुतीचे बुथ आणि कार्यकर्त्यांचा अभाव दिसून येत होता. अनेक ठिकाणी भाजपचे बुथ रिकामे होते. बविआचे नेते मात्र सर्वत्र फिरून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवत होते. शहरात कालच्या प्रकरणाची चर्चा रंगली होती.

म. टा. पू. पान क्र. 1

# वसई, नालासोपाऱ्यात मतदानाचा उत्साह

## नवमतदार, ज्येष्ठ मतदारांची संख्या लक्षणीय, नाव शोधण्यात मतदारांना साह्य

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई, नालासोपारा आणि बोईसर मतदारसंघांत मतदान अतिशय उत्साहात पार पडले. नवमतदार आणि ज्येष्ठांची संख्याही लक्षणीय होती. बोईसरमध्ये सायंकाळी पाच वाजेपर्यंत ६०.४ टक्के, वसईत ५७.४ टक्के तर नालासोपारा येथे ५०.६४ टक्के मतदान झाले होते. त्यानंतरच्या एक तासात मतदानाची आकडेवारी निश्चितच वाढल्याने मतदानाचा टक्का समाधानकारक असल्याची चर्चा होती.

मतदानाच्या दिवशी सकाळपासून सायंकाळपर्यंत गारेगार वारा वाहत होता. वातावरणात गारवा असल्याने सकाळी, त्यानंतर दुपारच्या वेळी सर्वाधिक मतदान झाले. सकाळच्या दोन तासांच्या सुरुवातीच्या टप्प्यात वसई विधानसभा क्षेत्रात ८.३२ टक्के, नालासोपारा विधानसभा क्षेत्रात ७.४८ टक्के आणि बोईसर विधानसभा क्षेत्रात ६. ९७ टक्के मतदान झाले होते. त्यानंतरच्या टप्प्यामध्ये वसई - विरार आणि बोईसरच्या ग्रामीण भागात मतदान केंद्रांवर मतदान करण्यासाठीचा मतदारांचा उत्साह दिसून आला.

रोहित राऊत



वसई - विरार भागात मतदान केंद्रांवर मतदारांनी सकाळपासूनच लांबच लांब रांगा लावण्यात आल्या होत्या. त्यामुळे सकाळच्या सत्रात सर्वच केंद्रांवर मोठी गर्दी झाली होती. मतदानाच्या आधी प्रत्येक मतदाराला घरपोच मतपत्रिका पोहोचवण्याचे उद्दिष्ट निवडणूक विभागाकडून ठेवण्यात आले होते. साधारण ९० हून अधिक टक्के मतदारांपर्यंत मतपत्रिका पोहोचवल्याचा दावा निवडणूक विभागाकडून करण्यात येत होता. मात्र अनेकांना मतपत्रिका मिळाल्याच नसल्याचे मतदारांनी सांगितले. त्यामुळे मतदान केंद्रांवर मतदाराचे नाव शोधाशोध करण्यात मतदार आणि निवडणूक विभागाचे कर्मचारी व्यग्र असल्याचे दिसून आले. वसई - विरारमध्ये मतदारांना आपली नावे शोधण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी विविध राजकीय पक्षांचे तंबू प्रत्येक मतदान केंद्राच्या ठराविक अंतरावर उभारल्याचे दिसून आले. यामध्ये कार्यकर्त्यांतर्फे मतदारांना आपली नावे शोधून देण्यासाठी मदत करण्यात येत होती.

वसई, नालासोपारा आणि बोईसर भागात ज्येष्ठ नागरिकांपासून ते दिव्यांग व्यक्तींनीदेखील मतदान केले. यासह तरुण वर्ग आणि इतर मतदारांनी देखील आवर्जून मतदानासाठी बाहेर पडला होता. लोकशाही बळकट करण्यासाठी बाहेर पडून मतदान केल्याचे मतदारांकडून सांगितले जात होते. नालासोपारा आणि विरार भागातील काही मतदान केंद्राबाहेर दुपारी १२ ते १ वाजताच्या दरम्यान लांबच लांब रांगा होत्या. त्यामुळे मतदान केंद्राच्या काही ठिकाणी मतदारांची गैरसोय झाली तर काही ठिकाणी मतदान केंद्र अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदारांची व्यवस्था करण्यासाठी धावपळ उडाल्याचे दिसून आले. यावेळी मतदान केंद्रांवर मोठ्या आकाराचे मंडप घालण्यात आल्याने उन्हाच्या त्रासापासून मतदारांना दिलासा मिळाला होता.

### बविआ कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

विरारच्या विवांता हॉटेलमध्ये मंगळवारी भाजप नेत्यांवर पैसे वाटपाचा आरोप बविआतर्फे करण्यात आला होता. साडेतीन तास झालेल्या नाट्यानंतर बविआ कार्यकर्त्यांमध्ये बुधवारी मतदानाच्या दिवशी चांगलाच उत्साह दिसून येत होता. प्रत्येक केंद्राच्या ठरवून दिलेल्या परिसरात तंबू लावून कार्यकर्ते मतदारांना नावे शोधण्यासाठी मदत करताना दिसून आले.

### चोख बंदोबस्त आणिं पाहणी दौरे

पालघर जिल्ह्यातील बोईसर, नालासोपारा आणि वसई या तीनही विधानसभा मतदारसंघांत मतदान केंद्रांवर सुरळीत मतदान पार पाडण्यासाठी निवडणूक विभागासह पोलीस विभागदेखील सज्ज होता. या केंद्रावर सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. नालासोपारा, वसई, विरार, बोईसर भागातील सर्वाधिक मतदार असलेल्या मतदान केंद्रांला भेटी देऊन पाहणी करण्यात आली. केंद्रावर उपस्थित पोलिस मोबाइल फोन नेण्यास मज्जाव करीत असल्याचे दिसून आले.

## भाईंदरमध्ये दुपारनंतर मतदानाला वेग

**म. टा. वृत्तसेवा, भाईंदर**

मिरा-भाईंदर मतदारसंघात सकाळपासूनच नागरिकांचा मतदानासाठी उत्साह ओसंडून वाहत होता. सायंकाळी पाच वाजेपर्यंत येथे ४८.३६ टक्के मतदानाची नोंद झाली होती. शहरातील एकही केंद्रावर अनुचित प्रकार घडला नसल्याने शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळच्या सत्रात अल्प प्रतिसाद दिसून आला, पण दुपारनंतर मात्र मतदानाला वेग आला होता. नागरिकांनी मतदान केंद्रावर मोठी गर्दी केली होती. परिणामी सकाळच्या तुलनेत दुपारी मतदानाचा टक्का ३० टक्क्यांनी वाढल्याचे दिसून आले.

मिरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघाकरता ५०३ केंद्रांवर बुधवारी मतदान प्रक्रिया पार पडली. सकाळपासुनच नागरिक मतदानासाठी हजेरी लावत होते. प्रामुख्याने राई, मुर्धा व भाईंदर पश्चिम पट्ट्यातील काही मतदान केंद्रांवर सकाळच्या सत्रात मतदारांची गर्दी दिसून आली. इतर मतदान केंद्रांवर मतदानाला अल्प प्रतिसाद पाहायला मिळाला. सकाळी चार तासांच्या सत्रात म्हणजेच अकरा वाजेपर्यंत अवघ्या १८.०२ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली आली आहे.

उन्हाचा पारा चढला तरी दुपारी एकनंतर अनेक मतदार मतदानासाठी घराबाहेर पडल्याचे पाहायला मिळाले. नयानगर, शीतल नगर येथील केंद्रांवर दुपारनंतर मतदारांच्या रांगा लागल्याचे पहायला मिळाले. परिणामी सायंकाळी पाचपर्यंत ३० टक्के मतदान वाढले असून ४८.३६ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली आहे. सायंकाळी पाचनंतरही शहराच्या विविध भागातील मतदान केंद्रांवर नागरिकांच्या लांबच लांब रांगा दिसून येत होत्या.

शहरातील सर्व मतदान केंद्रांवर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली.

N.B.T. पान क्र. 5

# मैंने कभी नहीं बांटे पैसे: तावडे

## बीजेपी के राष्ट्रीय महामंत्री ने कहा- केवल कार्यकर्ताओं का मार्गदर्शन कर रहे थे | तावडे ने कहा- होटल बविआ के नेता का है, ठाकुर ने भी पलटवार किया

■ विस, मुंबई: बीजेपी के राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे ने साफ कहा कि उन्होंने अपने 40 साल के राजनीतिक करियर मे कभी पैसे नही बांटे। भला बीजेपी का एक राष्ट्रीय नेता विरार मे जाकर पैसा बांटेगा? आम आदमी भी इसे स्वीकार नही कर पा रहा है। विरोधी दल ही शोर मचा रहे है, इसमे कोई तथ्य नही है। अगर ऐसा कुछ है तो होटल में लगे सीसीटीवी की जांच कर ले, सब दूध का दूध और पानी का पानी हो जाएगा।

बता दे कि विधानसभा चुनाव मतदान की पूर्व संध्या पर बहुजन विकास आघाड़ी (एमवीए) के नेता हितेंद्र ठाकुर ने विनोद तावडे पर पैसे बांटने का आरोप लगाया था। ठाकुर ने कहा था कि तावडे विरार के एक होटल मे वोटरों को लुभाने के लिए 5 करोड़ रुपये बांट रहे थे। इससे संबधित कई विडियो भी सामने आए है।

**तावडे ने दी सफाई:** बविआ के इस आरोप पर तावडे ने एनबीटी से बात करते हुए कहा कि क्या वे मूर्ख है, जो विरोधियों के होटल मे जाकर पैसे बांटेंगे। उन्होंने बताया कि वे चुनाव के नियमों से अच्छी तरह वाकिफ है। वे मूर्ख नही है कि राजनीतिक विरोधियों के होटल मे इस तरह की गतिविधियों में शामिल हो। वे तो वहां पर केवल पार्टी कार्यकर्ताओं को चुनाव प्रक्रियाओं पर मार्गदर्शन कर रहे थे, मतदान प्रक्रियाओं के बारे में उनसे चर्चा कर रहे थे। मै प्रचार नही कर रहा था। तावडे ने जोर देकर कहा कि उनके पास कोई पैसा नही था। उन्होंने चुटकी लेते हुए कहा कि राहुल गांधी और सुप्रिया सुले ने जो पांच करोड़ रुपये देखे है, कृपया उन्हें मुझे भेज दें। वे इसे मेरे बैंक खाते में जमा करा सकते है।




बुधवार को बीजेपी नेता विनोद तावडे ने अपने मतदान अधिकार का प्रयोग किया। उन्होंने इस दौरान एनबीटी से बातचीत के दौरान उन पर लगाए गए आरोपों को लेकर सफाई दी। दूसरी फोटो मे, नालासोपारा के होटल मे तावडे पर पैसे बांटने का आरोप लगाते हुए बविआ कार्यकर्ताओ ने मंगलवार को जमकर हंगामा किया था।

## प्रेस कॉन्फ्रेंस के लिए तावडे समेत चार पर केस



■ निस, नालासोपारा: मंगलवार को नालासोपारा के एक होटल मे प्रेस कॉन्फ्रेंस करने को लेकर बीजेपी नेता विनोद तावडे, राजन नाईक के अलावा बहुजन विकास आघाडी नेता हितेंद्र ठाकुर और क्षितिज ठाकुर के खिलाफ मामला दर्ज किया गया है। आरोप है कि प्रेस कॉन्फ्रेंस करके इन लोगों ने आचार संहिता का उल्लंघन किया। इससे पहले इस होटल मे विनोद तावडे ने कथित रूप से वोट के लिए नोट बांटे थे।

## इससे बीजेपी का वोट 5% बढ़ेगा: राजन नाईक



■ निस, नालासोपारा: बीजेपी के नेता विनोद तावडे पर नोट बाटने का जो आरोप बहुजन विकास आघाडी ने लगाया है, वह केवल स्टंट था। यह बात नालासोपारा विधानसभा से उम्मीदवार राजन नाईक ने कही। उन्होंने कहा कि बविआ के लगाए गए आरोपो से हमारा वोट पाच से सात प्रतिशत बढ़ जाएगा। वसई निर्वाचन क्षेत्र मे भी इसका लाभ होगा। बता दे कि मंगलवार को बविआ के कार्यकर्ताओ ने विवांता होटल मे बीजेपी नेता विनोद तावडे पर नोट बांटने का आरोप लगाया था। कार्यकर्ताओ ने साढ़े चार घंटे तक बीजेपी नेताओ व कार्यकर्ताओ को बंधक बनाकर रखा था।

## होटल में बेचैन थे तावडे: हितेंद्र ठाकुर

■ निस, नालासोपारा: नालासोपारा के विवांता होटल मे मंगलवार को नोट बांटे जाने की घटना को लेकर जो ड्रामेबाजी हुई और विडियो वायरल हुआ, उसे लेकर बहुजन विकास आघाडी के अध्यक्ष हितेंद्र ठाकुर ने एक बार फिर से बीजेपी नेता विनोद तावडे पर निशाना साधा है। इस मामले मे तावडे समेत बीजेपी के 36 पदाधिकारियो और कार्यकर्ताओ के खिलाफ मामला दर्ज किया गया है। ठाकुर ने कहा कि मंगलवार को होटल के अंदर बीजेपी नेता तावडे को जब नोटो के साथ पकड़ा गया, तो वे काफी बेचैन नजर आ रहे थे। मुंबई जाने के बाद उनका गला खराब हो गया। बुधवार को बविआ के आरोपो पर बीजेपी नेता तावडे ने सफाई दी है। तावडे ने आरोप लगाया कि होटल मे मिले पैसे बीजेपी के नही थे। वह होटल बविआ के किसी नेता का है। ठाकुर ने तावडे के इस आरोपो का जवाब देते हुए कहा कि बीजेपी नेता कह रहे है कि इस मामले से बीजेपी को फायदा होगा, इसका मतलब यह है कि होटल मे मिले पैसे बीजेपी के ही थे, उन्होने ही वोटरो मे पैसे बाटे है। अगर होटल मेरा था, तो बीजेपी ने इसे बुक क्यो कराया? तावडे को वह होटल अब मेरे नाम पर कर देना चाहिए।

नवभारत पु. पान क्र. ३

## छिटपुट तनाव के साथ शांतिपूर्ण माहौल में हुआ चुनाव

# मीरा-भाईदर विस सीट पर 51.76 प्रतिशत हुआ मतदान



■ मीरा-भाईदर, (सं). 145 मीरा भाईदर विधानसभा सीट पर छिटपुट तनाव के बावजूद शांतिपूर्ण माहौल में चुनाव संपन्न हुआ. विधानसभा क्षेत्र में 51.76 प्रतिशत मतदान होने की जानकारी चुनाव आयोग द्वारा दी गई है. इस सीट पर चुनाव लड़ रहे 17 उम्मीदवारों का भाग्य ईवीएम मशीन में कैद हो गया है, जिसका निर्णय 23 नवंबर को होगा. सुबह 11 बजे तक करीब-करीब सभी मतदान केंद्रों पर मतदान की गति धीमी रही, लेकिन उसके बाद मतदान ने गति पकड़ी. इस सीट पर मुख्य मुकाबला कांग्रेस के मुजफ्फर हुसैन, भाजपा के नरेंद्र मेहता और निर्दलीय उम्मीदवार गीता जैन के बीच है. मतदान प्रक्रिया के दौरान मीरारोड के शांति नगर में कुछ मतदान केंद्रों पर एक साथ अधिक मतदाताओं के पहुंच जाने से थोड़ी देर तनाव की स्थिति देखी गई, इसकी सूचना मिलते ही गीता जैन वहां पहुंची और पुलिस प्रशासन की मुस्तैदी से मामला शांत हुआ.

### MBVV पुलिस का कड़क बंदोबस्त

इसी प्रकार से भाईंदर पश्चिम के जैन बहुल क्षेत्र, बावन जिनालय मंदिर परिसर में अहिंसा चौक पर नरेंद्र मेहता और गीता जैन के समर्थकों में भिड़ंत हो गई थी, लेकिन तुरंत ही विवाद को सुलझा कर मामले को नियंत्रित किया गया मेहता खुद वहां उपस्थित रह कर कार्यकर्ताओं को शांत कराया.

मीरा - भाईंदर, वसई - विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत पालघर जिला के बोइसर विधानसभा क्षेत्र का कुछ हिस्सा, नालासोपारा, वसई और ठाणे जिला के ओवला -माजीवाड़ा, मीरा-भाईंदर विधानसभा ऐसे कुल 5 विधानसभा क्षेत्रों के 449 इमारतों में 17,776 बूथ पर मतदान प्रक्रिया संपन्न हुई.

# वसई-नालासोपारा विस सीट पर शांतिपूर्ण मतदान



■ नालासोपारा, (सं). वसई व नालासोपारा विधानसभा सीट के लिए बुधवार को होने वाला मतदान शांतिपूर्ण रूप से संपन्न हो गया है. सुबह बजे से ही मतदान केंद्रों पर मतदाताओं की लंबी कतारें देखने को मिली. मतदान केंद्रों पर सुरक्षा व्यवस्था चाक चौबंद रही. इसके साथ ही वरिष्ठ अधिकारी पुरे दिन क्षेत्र का दौरा कर मतदान केंद्रों का लगातार जायजा लेते नजर आये. लेकिन मतदान संपन्न होने के साथ ही संबंधित अधिकारियों ने राहत की सांस ली. अब मतगड़ना 23 नवंबर को होनी वाली है.

नवभारत पु. पान क्र. 4

## सात गैर राजनीतिक लोगों के बयान दर्ज

# विनोद तावड़े के मामले में CCTV हार्ड डिस्क जब्त



■ मुंबई, (सं). महाराष्ट्र विधानसभा चुनाव के ठीक एक दिन पहले बीजेपी के राष्ट्रीय महासचिव विनोद तावड़े के नोट कांड मामले में नया अपडेट सामने आया है. चुनाव आयोग के उड़न दस्ते ने तुलुंज पुलिस स्टेशन में दर्ज अपनी शिकायत में इस बात का जिक्र किया है कि नोट के 500 लिफाफे के साथ 4 शराब की बोतल भी बरामद की गई है. इसके साथ ही चुनाव अधिकारी ने कहा है कि 9.86 लाख रुपये की नगद राशि भी बरामद की गई है. पुलिस सूत्रों से मिली जानकारी के अनुसार अब तक 8 लोगों के बयान इस बाबत लिए गए हैं. ये वे लोग हैं जो किसी भी पार्टी से जुड़े नहीं हैं. इसके साथ ही होटल से सीसीटीवी का हार्ड डिस्क भी जब्त किया गया है. महत्वपूर्ण है कि बहुजन विकास आघाड़ी के नेता हितेंद्र ठाकुर ने आरोप लगाया था कि होटल के कैमरे को पहले ही बंद कर दिया गया था.

**पुलिस की जांच शुरू :** महाराष्ट्र के पालघर जिले के विरार के एक होटल में वोट के लिए नगदी बांटने के आरोपों के बीच हाई वोल्टेज ड्रामा के बाद मीरा भाईंदर वसई विरार पुलिस ने मंगलवार को भाजपा के राष्ट्रीय महासचिव विनोद तावड़े, नालासोपारा से पार्टी उम्मीदवार राजन नाईक और 200 से अधिक अन्य के खिलाफ तीन एफआईआर दर्ज की है. तावड़े और वहां से बीजेपी उम्मीदवार राजन नाईक के खिलाफ दर्ज एफआईआर में से एक में कहा गया है कि होटल के तीन कमरों से 9.86 लाख रुपये नकद, चार शराब की बोतलें, 500 लिफाफे और भाजपा उम्मीदवार राजन नाईक की प्रचार सामग्री जब्त की गई है.

पुलिस अधिकारियों ने बताया कि फ्लाइंग स्क्वायड टीम (एफएसटी) के सदस्यों और एक पुलिस हेड कांस्टेबल की शिकायत पर तुलिंज पुलिस स्टेशन में तावड़े, नाईक, पार्टी कार्यकर्ताओं, पदाधिकारियों और नेताओं के खिलाफ एफआईआर दर्ज की गई हैं.

### चुनाव आयोग की शिकायत और बयान

एफएसटी सदस्य राजू मसाले द्वारा दर्ज एफआईआर के अनुसार, प्राप्त सूचनाओं के आधार पर कार्रवाई करते हुए, जब दो एफएसटी टीमें दोपहर 12 बजे विरार (पूर्व) में होटल विवांता की 5वीं मंजिल पर पहुंचीं तो उन्होंने हॉल में तावड़े, नाईक और दर्जनों अन्य भाजपा कार्यकर्ताओं को पाया. एफएसटी की टुकड़ियां चौथी मंजिल पर स्थित होटल के कमरों की जांच करने गईं, जिस दौरान कमरा नंबर 405, 410 और 416 से कुल 9 लाख 86 हजार रुपये जब्त किया गया. इसके अलावा नाईक से संबंधित 500 लिफाफे, शराब की चार बोतलें और प्रचार सामग्री भी मौके से मिली. इस मामले में दर्ज दूसरी शिकायत में प्रचार अवधि समाप्त होने के बाद बाहर से आए नेता के खिलाफ़ आचार संहिता के उल्लंघन का मामला दर्ज किया गया है. पुलिस ने पुलिस आयुक्त के आदेश का उल्लंघन करने और चुनाव से 48 घंटे पहले अन्य निर्वाचन क्षेत्रों का दौरा करने के कानून का उल्लंघन करने के लिए स्वतः संज्ञान लेते हुए केस दर्ज किया गया है. तीसरी एफआईआर तावड़े और अन्य के खिलाफ महाराष्ट्र विधानसभा चुनाव से पहले प्रेस कॉन्फ्रेंस आयोजित करने के लिए दर्ज की गई, जिसमें हितेंद्र ठाकुर उनके बेटे ने तावड़े के साथ प्रेस कॉन्फ्रेंस की थी. हालांकि चुनाव आयोग के अधिकारियों ने इसे बीच में ही रोक दिया था.

CamScanner